R.C.S. No.20-2022

नियमीत दिवाणी दावा क्र. २०/२०२२
अल्का / कार्यकारी अभियंता
निशाणी क्रमांक **२६**

## वादी तर्फे सरतपास विधीज्ञ श्री. एस. बी. खोत यांच्या मार्फत सुरु

सध्या मी तलाठी सज्ञा आनंदवाडी ता. भुम येथे तलाठी म्हणून कार्यरत आहे. दिनांक ०७.०३.२०२२ रोजी मी तलाठी सज्ञा देवगाव–बु. येथे कार्यरत होते. वादीचे गाव ऊंडेगाव हे देवगाव–बु. तलाठी सज्ञा अंतर्गत येते. मी दिनांक ०७.०३.२०२२ रोजी मी वादीची ऊंडेगाव येथील जमीन गट नंबर ११/१/क मध्ये पंचनाम्यासाठी गेले होते, त्यावेळी माझ्यासोबत पंच हजर होते. पंचासमक्ष पाहणी केली असता वादीचा एक हेक्टर ऊस, ठिबक संच व ६० पी. व्ही. सी. पाईप जळाल्याचे दिसून आले. तसा पंचासमक्ष पंचनामा करुन त्यांच्या त्यावर सहया घेतल्या. आता मला नि. क्र. २७ वरील पंचनामा दाखवला. त्यावर माझी व पंचांच्या सहया असून त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे.

(प्रतिवादीचे विधीज्ञ श्री. भालेराव यांनी असा आक्षेप नोंदविला की, पंचनाम्याची मुळ प्रत दाखल नाही. तसेच आज रोजी साक्षीदारांनी ती सोबत देखील आणलेली नाही म्हणून त्यास निशाणी क्रमांक देण्यात येऊ नये. याऊलट वादीचे विधीज्ञ यांचे असे म्हणणे की, तयांनी मुळ पंचनामा आणण्यासाठी अर्ज केलेला आहे.) मुळ पंचनाम्याची प्रमाणित प्रत दाखल आहे व ती तलाठी यांनी त्यांचे कर्तव्य पालन करीत असताना तयार केलेली आहे. सबब, पंचनाम्यास भारतीय पुरावा कायद्याच्या अधिन राहून निशाणी क्रमांक देण्यात येतो.

## प्रतिवादी तर्फे ऊलटतपास विधीज्ञ श्री. एस. पी. भालेराव यांच्या मार्फत सुरु

२. मी आज रोजी मुळ संचिका सोबत आणलेली नाही. संचिका मिळणेसाठीचा अर्ज मी तहसील कार्यालय, परंडा येथे दिलेला आहे. मुळ संचिकेचा शोध घेतला परंतु ती मिळून येत नसल्याचे मला सांगण्यात आले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी मोक्याच्या

ठिकाणी न जाता पंचनामा केला. हे म्हणणे खरे नाही की मी पंचांच्या कोऱ्या कागदावर सहया घेऊन खोटा पंचनामा तयार केला आहे. हे म्हणणे खरे आहे ऊस हा ओला असतो आणि तो जळाल्यानंतर त्याचे पाचट जळते, ऊस तसाच उभा असतो. त्याप्रमाणे काही ऊस ऊभा आणि काही पडलेला होता. वादीच्या क्षेत्रातील किती ऊस जळालेला आणि किती ऊस पडलेला, ऊभा होता हे मला नेमके सांगता येत नाही. वादीने पी. व्ही. सी. पाईप, ठिबक सिंचन विकत आणल्याच्या पावत्या मी पाहिलेल्या नाहीत. त्यापैकी नेमके किती ठिबक संच आणि किती पाईप जळाले हे मला सांगता येत नाही. हे म्हणणे खरे नाही की वादीला फायदा व्हावा म्हणून खोटा पंचनामा तयार केला व आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

श्रवणोत्तर स्वीकृत

RAJU TUKARAM INGLE

Digitally signed by RAJU TUKARAM INGLE
Date: 2025.03.15 17:54:51 +0530

दिनांकः–१५.०३.२०२५

**आर. टी. इंगळे**

दिवाणी न्यायाधीश व. स्तर, परंडा

CERTIFICATE

I affirm that, the contents of this P.D.F file Judgment/Order/Record and Document are same, word to word, as per the original Judgment/order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | - | Vaibhav Mohanrao Ingale<br>Stenographer (Grade-III) |
| Court | - | Civil Court Senior Division, Paranda. |
| Date | - | 15-03-2025 |
| Order signed by the presiding officer on | - | 15-03-2025 |
| Order uploaded on | - | 15-03-2025 |